**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/महाडीबीटी-शिष्यवृत्ती/२०१९-२०/ दिनांक : १६.०८.२०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ :- मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०६९५ दि. ०९.०८.२०१९.

उपरोक्त विषयाबाबत उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वर संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्रानुसार कळविल्याप्रमाणे पुणे विभागांतर्गत असलेल्या अशासकीय अनुदानित/अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान- विना अनुदानित) महाविद्यालय यांमधील विविध अभ्यासक्रमांतर्गत ी सन २०१९-२० करीता शासनाने/विद्यापीठाने मंजूर केलेली शिक्षण शुल्क व इतर शुल्क यास महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी द्यावयाची आहे. सदरहू काम जलदरितीने पूर्ण करण्यासाठी या कार्यालयामार्फत खालील नमूद केलेल्या ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

Scanned by CamScanner

| अ.क्र. | दिनांक व वेळ | स्थळ | तालुकानिहाय महाविद्यालये |
|---|---|---|---|
| १ | १९.०८.२०१९ स. १०.०० ते साय. ५.०० | आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे | मुळशी, मावळ, भोर, वेल्हे, बारामती येथील सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये |
| | २०.०८.२०१९ स. १०.०० ते साय. ५.०० | | पुणे शहर, पिंपरी – चिंचवड, हवेली येथील सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये आणि विद्यापीठे |
| | २१.०८.२०१९ स. १०.०० ते साय. ५.०० | | आंबेगाव, शिरुर, खेड, पुरंदर, दौंड, इंदापूर येथील सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये |
| २ | २२.०८.२०१९ स. १०.०० ते साय. ५.०० | एस.एम.बी.एस.टी. महाविद्यालय, संगमनेर | नगर शहर, संगमनेर, जुन्नर, राहुरी, राहाता, श्रीगोंदा, सिन्नर येथील सर्व सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित /कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये |
| | २३.०८.२०१९ स. ९.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत | | कोपरगाव, पाथर्डी, श्रीरामपूर, जामखेड, कर्जत, नेवासा, शेवगाव येथील सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित /कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये |
| ३ | २३.०८.२०१९ दुपारी ३.०० वाजल्यापासून पुढे | के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक | नाशिक शहर, त्र्यंबकेश्वर, येवला, सुरगणा, पेठ, इगतपुरी येथील सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित /कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये आणि विद्यापीठ |
| | २४.०८.२०१९ स. १०.०० ते साय. ५.०० | | मालेगाव, कळवण, निफाड, दिंडोरी, देवळा, बागलाण सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/ कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये |

**वरील ठिकाणी नमूद केलेल्या दिनांकास आणि वेळेवर आपण सर्व महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठांमधील संबंधित लिपिकाने सोबत महाविद्यालयाचे शासन मान्यता आदेश, संलग्निकरण पत्र आणि अन्य सर्व मान्यता अनुषंगिक पत्र तसेच फी स्ट्रक्चर याची हार्ड कॉपी आणि सॉफ्ट कॉपी (पीडीएफ फाईल) पेन ड्राईव्हमध्ये आणणे अत्यावश्यक आहे. तसेच सदरहू ठिकाणी वेळेत व दिनांकास महाडीबीटी पोर्टलवर विविध अभ्यासक्रमांचे शुल्क कसे भरावे याबाबत सुरुवातीस मार्गदर्शन करण्यात येणार आहे आणि त्याचेनंतर लगेचच महाविद्यालयांनी त्यांची शुल्कविषयक माहिती भरुन त्याप्रमाणे सदरहू माहिती या कार्यालयाकडून मंजूरी घ्यावयाची आहे. तरी उपरोक्त नमूद कालावधीमध्ये वेळेवर सर्व महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठांमधील संबंधित कामकाज करणाऱ्या लिपिकाने न चुकता उपस्थित राहून त्याच दिवशी महाविद्यालय/ संस्था/ विद्यापीठांचे शासन मान्यतेने जे विविध अभ्यासक्रम राबविले जातात त्यांना शासनाने/विद्यापीठाने मान्यता दिलेल्या विविध प्रकारच्या शुल्कांना महाडीबीटी पोर्टलवर मान्यता घेण्याबाबतची योग्य ती कार्यवाही पूर्ण करावी.**

**सही/-**
**(डॉ. विजय नारखेडे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

**प्रत-** मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner